दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजय भांगे

बीड/महाराष्ट्र  गुरुवार दि.५ डिसेंबर २०२४  आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५  वर्ष २ रे  अंक-१००  पाने ४  किंमत ४ रुपये

## आता अजित पवार अन् एकनाथ शिंदेंना भाजप म्हणजे काय हे समजले असेल

**मुंबई (वृत्तसंस्था)**–मी पहिल्या दिवशीच सांगितले होते की एकनाथ शिंदे आणि अजित पवारांना भारतीय जनता पक्ष काय आहे हे आता कळेल आणि आता ते कळायला सुरुवात झाली, असे म्हणत काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी टोला लगावला आहे.भाजपच्या गटनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड झाल्यामुळे ते आता मुख्यमंत्री होणार हे फिक्स झाले आहे. यातच अजित पवारांना अमित शहा यांनी भेट टाळली. तर एकनाथ शिंदे यांना गृहमंत्रीपद देण्यास नकार दिल्यानंतर नाना पटोले यांनी असे म्हटले आहे.केंद्रीय मंत्री अमित शहाच्या भेटीशिवाय अजित पवार मुंबईत परतले आहेत. दोन दिवसांपासून पवारांनी केंद्रीय गृहमंत्री शहा यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला. काल सुनील तटकरेंनी आज भेट होण्याची शक्यता असल्याचेही म्हटले होते. मात्र, मुंबईत सत्तास्थापनेच्या हालचालीना वेग आल्यानंतर आता अजित पवार भेटीशिवायच मुंबईत दाखल झाले आहेत.भाजपच्या विधीमंडळ गटाची आज बैठक होणार आहे. मुख्यमंत्री हा भाजपचाच होणार हे आता स्पष्ट झाल्याचे समजते. भाजप गटनेत्याची निवड झाल्यानंतर लवकरच सरकार स्थापनेचा मार्ग मोकळा होईल.

## शिंदेंचे माहिती नाही,मी मात्र शपथ घेणार

# अजित पवारांच्या विधानामुळे हास्यकल्लोळ एकनाथ शिंदे यांनीही काढला दादांचा अनुभव

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महायुतीच्या नेत्यांनी बुधवारी राज्यपालांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याचा दावा केला. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत पत्रकारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांच्या मंत्रिमंडळातील समावेशाविषयी प्रश्न केला. त्यावर शिंदेंनी उत्तर देण्यापूर्वीच अजित पवारांनी शिंदेंचे माहिती नाही, पण मी मात्र निश्चितच शपथ घेणार आहे, असे स्पष्ट केले. त्यांच्या या उत्तरामुळे वार्तालापात एकच हस्यकल्लोळ उडाला.

देवेंद्र फडणवीस यांची बुधवारी भाजपच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. त्यानंतर त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांच्यासह राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांची भेट घेऊन सरकार स्थापन करण्याचा दावा सादर केला. त्यानंतर राज्यपालांनी फडणवीस यांना सरकार स्थापन करण्याचे औपचारिक निमंत्रण दिले. त्यानंतर महायुतीच्या तिन्ही नेत्यांनी पत्रकार परिषदेला संबोधित केले.

या पत्रकार परिषदेत पत्रकारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना त्यांच्या मंत्रिमंडळातील संभाव्य समावेशावर प्रश्न केला. या प्रश्नाला उत्तर देताना ते म्हणाले, या प्रकरणी देवेंद्र फडणवीस यांच्यासह मी स्वतःही भूमिका स्पष्ट केली आहे. सायंकाळपर्यंत थांबा, सर्व चित्र स्पष्ट होईल, असे ते म्हणाले. शिंदे बोलत असताना अजित पवारांनी मध्येच हस्तक्षेप करत शिंदेंचे माहिती नाही, पण मी मात्र निश्चितपणे शपथ घेणार आहे, मी थांबणार नाही, असे स्पष्ट केले. त्यांच्या या उत्तरावर शिंदेंसह देवेंद्र फडणवीस व उपस्थित पत्रकार खळखळून हसले.त्यानंतर एकनाथ शिंदे यांनीही अजित पवारांना चपखल प्रत्युत्तर दिले. दादांना पहाटे व सायंकाळीही घेण्याचा (शपथ) अनुभव आहे, असे ते म्हणाले. त्यांच्या उत्तरावरही पत्रकार परिषदेत हास्यकल्लोळ उडाला. शिंदे यांच्या उत्तरानंतर शांत बसतील ते अजित पवार कसले, ते पुढे म्हणाले, पूर्वी आम्ही दोघांनी (फडणवीस व पवार) सकाळी शपथ घेतली होती. तेव्हा हे राहून गेले होते. पण आता पुढे ५ वर्षे आम्ही हे पद ठेवणार आहोत. यावरही उपस्थित खळखळून हसले. या दोन्ही नेत्यांच्या या संवादाचा एक व्हिडिओ चांगलाच व्हायरल होत आहे.

तत्पूर्वी, देवेंद्र फडणवीस यांनी एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेने मुख्यमंत्री म्हणून आपल्याला पाठिंबा दिल्याची घोषणा केली. तसेच शिंदेंना मंत्रिमंडळात राहण्याची विनंती केल्याचेही सांगितले. ते म्हणाले, शिवसेनेचे अध्यक्ष व नेते म्हणून एकनाथ शिंदे यांनी मंत्रिमंडळात राहावे अशी विनंती मी त्यांना केली. ते आमची विनंती मान्य करतील असा मला विश्वास आहे. आमच्यामध्ये मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आदी पदे केवळ तांत्रिक आहेत. आम्ही सर्वजण मिळून महायुती सरकारचे काम करू, असे ते म्हणाले. भाजपने देवेंद्र फडणवीस यांची गटनेतेपदी निवड केल्यानंतर तेच नवे मुख्यमंत्री होतील हे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर आता उद्या सायंकाळी ५.३० वा. ते मुख्यमंत्री म्हणून पद व गोपनीयतेची शपथ घेतील. सूत्रांच्या माहितीनुसार, उद्या केवळ मुख्यमंत्री व २ उपमुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईल. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह देशभरातील प्रमुख नेतेमंडळी उपस्थित राहणार आहेत. पण संभाव्य मंत्रिमंडळाविषयी अत्यंत गुप्तता पाळण्यात आली आहे.



## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित सुधार योजनेच्या निधीचा गैरवापर


### समर्थ कंट्रक्शन व पाठक यांच्यावर तात्काळ कारवाई करण्यात यावी–प्रेम कांबळे

**बीड । प्रतिनिधी**

बीड लोकशाहीर अण्णाभाऊ साठे दलित सुधार योजनेचा निधी इतरत्र वळवून शहरातील शिव शारदा बिल्डिंग ते मोंढा रस्त्याचे काम सुरू केलेले आहे हे काम शासनाच्या नियम व अटीत बसत नसल्याने या रस्त्याचे देयक शासनाने अदा करू नये तसेच समर्थ कंट्रक्शन चे पाठक हे बीड मधील इंजिनियर अधिकारी पोसन्याचे कार्य करत आहेत शिव शारदा बिल्डिंग ते मोंढा रस्त्याचे काम अंदाज पत्रकानुसार नसून हे काम समर्थ कंट्रक्शन पूर्ण पणे बोगस करत आहे आमची दलित समाजाच्या वतीने विनंती आहे की समर्थ कंट्रक्शन असतील त्यामध्ये अधिकारी व इंजिनीयर असतील यांच्यावरती ट्रॉसिटी अंतर्गत गुन्हे दाखल करून कायदेशिर कारवाई झाली पाहिजे. अन्यथा या विषयावरती मोठे आंदोलन उभे केल्याशिवाय शांत बसणार नाही असे आवाहन व मागणी सामाजिक कार्यकर्ते प्रेम कांबळे यांनी केलेली आहे व दलित समाजाच्या वतीने केली आहे



## महापरिनिर्वाण दिनी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना समता सैनिक दलाची मानवंदना



**बीड । प्रतिनिधी**

बीड(प.) जिल्ह्यामध्ये समता सैनिक दलाचे एकूण ३६२ समता सैनिक आहेत. यामध्ये बीड तालुका, शहर, वडवणी, गेवराई (धुमेगाव), शिरूर (राक्षस भवन तांबा), आष्टी (कडा) येथील सैनिकांचा समावेश आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ६८ व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त जास्तीत जास्त समता सैनिकांनी ६ डिसेंबर महापरिनिर्वाणदिनी उपस्थित राहून डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांना मानवंदना द्यावी.

भारतीय बौद्ध महासभा , समता सैनिक दल, बीड बटालियन

## धस यांना कॅबिनेट मंत्री व पालकमंत्री करावे–प्रणव जावळे यांची मागणी

**पाटोदा । प्रतिनिधी**

माजी मंत्री व आमदार लोकनेते सुरेश आण्णा धस यांना यंदा राज्याच्या कॅबिनेट मंत्री पदी





निवड करून कॅबीनेट मंत्री व पालकमंत्री करावे अशी मागणी प्रणव जावळे यांनी केली आहे. प्रसिद्धी पत्रकात त्यांनी म्हटले आहे की सर्वसामान्य जनतेशी नाळ असलेले लोकनेते सुरेश आण्णा धस ही राजकारणातील मुरब्बी व मुत्सद्दी नेते असुन आमदारकीची पाचवी टर्म असल्यामुळे त्यांना मोठा अनुभव आहे आष्टी पाटोदा मतदारसंघाच्या सर्वांगीणविकासासाठी सुरेश आण्णा धस यांचे मोलाचे योगदान असुन विकासाभिमुख नेता म्हणून त्यांची संपूर्ण महाराष्ट्रभर ओळख आहे मंत्रिमंडळात त्यांना संधी मिळाल्यास संपूर्ण जिल्ह्याला निश्चितच मोठा फायदा होणार असून सुरेश धस यांच्यासारख्या खमक्या नेतृत्वाची आज संपूर्ण जिल्ह्याला गरज आहे ही उणीव भरून काढण्यासाठी माजी मंत्री सुरेश धस यांना यंदा कॅबिनेट मंत्रीपदाची पालकमंत्री म्हणून संधी द्यावी अशी मागणी प्रणव जावळे यांनी केली आहे.

## नायगाव शहरात भर दिवसा चोरट्याने

# उभा टाकलेल्या ट्रकच्या केबिन मधून तीन लाखाची कॅश केली लंपास

**नायगाव । हानुमंत चंदनकर**

नायगाव शहरात आज भर दिवसा आंबेडकर चौकातून उभे असलेल्या गोदाम समोरील ट्रक मधून चोरट्याने पाळत ठेवून ड्रायव्हर साईडच्या बाजूस ठेवलेल्या सीटवरील तीन लाखाची बॅग घेऊन पोबारा केला. शहरातील एका उद्योगपतीने कुष्णूर येथून सूर्यफूल तेल घेऊन येण्यासाठी रिकाम्या टाक्या गोदाम समोरून ट्रक मध्ये टाकत असताना समोर उभा टाकलेल्या प्र क्रमांक एम एस २६ एडी झिरो १५१ घटनेतून खरेदी करण्यासाठी जात असलेल्या वाहनातील जवळजवळ तीन लाख रुपयांची केस घेऊन छोट्या आणि धूम ठोकला सदर चोरट्याचा काही तरुणांनी पाठलाग करण्याचा प्रयत्न केला पण ते मोटरसायकल वरून दोघेजण पळुनजाण्यात यश मिळवले.





पाहता पाहता शहरातील मुख्य वस्तीत असलेल्या आंबेडकर चौकात जमाव जमला असून त्यातील काही तरुणांनी चोरट्याचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला पण ते पळून जाणे यशस्वी झाले आहेत. घडलेल्या घटनेचा तपशील तक्रार देण्यासाठी सदर ट्रकचे ड्रायव्हर हे नायगाव पोलिस ठाण्यात गेले असल्याची कळले आहे.

# सर्पमित्र राजेश पाटील व मोहन पाटील यांनी अजगर व सापाला दिले जीवनदान



**उरण । विठ्ठल ममताबादे**

दिनांक ०२ डिसेंबर २०२४ रोजी रात्री ०९:१५ वाजता अंकुर क्लिनिक चिरनेर येथून भारतीय अजगर(Indian rock python) फ्रेंड्स ऑफ नेचर(फॉन) चिरनेर उरण चे उपाध्यक्ष राजेश पाटील व स्वयंसेवक मोहन पाटील यांनी पकडून येथे सुरक्षित केला व दिनांक ०३ डिसेंबर २०२४ रोजी चिरनेर वनपरिक्षेत्रात त्यास मुक्त केले. त्याच वेळेस चिरनेर येथील सुरस बुक स्टॉल येथून त्यांच्या दुकानाजवळ शाळेच्या विद्यार्थ्यांनी साप पाहिला व दुकानाच्या मालकाना त्याबाबत कल्पना दिली असता त्यांनी सर्पमित्र राजेश पाटील ह्यांना संपर्क केला.सर्पमित्र राजेश पाटील व मोहन पाटील ह्यांनी तो साप Slender coral snake(Calliophis melanurus)स्लेंडर कोरल सर्प (रातसर्प/पोवळा) असल्याचे सांगितले.स्लेंडर कोरल हा साप भारतात सर्वत्र आढळणारा आकाराने सर्वात छोटा विषारी साप असून दुर्मीळ साप आहे. त्यावेळेस फॉन संस्थेचे सदस्य विवेक हुदली व निकेतन ठाकूर हे सुद्धा उपस्थित होते.

# ३ जानेवारी पासुन गेवराईत राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन

## विविध मान्यवरांच्या हस्ते होणार उदघाटन; कृषीभूषण महेश बेदरे यांची माहिती

# किसान कृषी महोत्सव २०२५;एक पाऊल हरीतक्रांती कडे

**गेवराई । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील शेतकर्यांना तंत्रज्ञानाची माहिती मिळावी या उद्देशाने गेल्या १६ वर्षांपासून किसान कृषि विकास प्रतिष्ठानच्या वतीने स्वर्गीय कृषिरत्न गणेशराव बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ या प्रदर्शनाचे आयोजन केले जाते दरवर्षीप्रमाणे याही वर्षी नववर्षाच्या सुरुवातीलाच दिनांक ०३ ते ०७ जानेवारी दरम्यान किसान कृषी महोत्सव या कृषि प्रदर्शनात द्वारे बीड रोड वरील आठ एकर विस्तारणे दसरा मैदानात भव्य अशा ५ दिवसीय राज्यस्तरीय कृषी प्रदर्शनाचे आयोजन केले असल्याची माहिती कृषी प्रदर्शन आयोजन समितीचे संयोजक कृषिभूषण महेश बेदरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे मराठवाडयातील शेतकयांना नवतंत्रज्ञान मिळावे म्हणून येथील किसान शेतकऱ्यांसाठी हेलिकॉप्टर राइडिंगचे खास आकर्षण; आता शेतकरी बसणार हेलिकॉप्टरमध्ये गेवराईच्या कृषी प्रदर्शनांत गत वर्षापासून शेतक-यांसाठी खास हेलिकॉप्टर राईडचे आयोजन केले यामध्ये शेतकऱ्यांना अल्प दरामध्ये ही हवाई सफर दिली जाणार आहे आपल्या शेतामध्ये राब राब रावणाऱ्या कष्टकरी शेतकऱ्यांना कृषी प्रदर्शनाच्या माध्यमातून आयोजित केलेल्या हेलिकॉप्टर सफरीचा आनंद घेता येणार आहे या हेलिकॉप्टर राइडिंग मुळे शेतकऱ्यांचे हेलिकॉप्टर मध्ये बसण्याचं स्वप्न प्रतीक्षात पूर्ण होणार आहे.कृषी विकास प्रतिष्ठान मराठवाडाभर बीड, जालना, परभणी, हिंगोली सह इतर ठिकाणी या कृषी प्रदर्शनाचे आयोजन करते बीड जिल्ह्यातील शेतकर्याच्या आग्रहाने पुन्हा या प्रदर्शनाचे आयोजन स्वर्गीय कृषिरत्व गणेश बेद्रे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ प्रदर्शनाचे आयोजन केले असून प्रकल्प संचालक आत्मा, महाराष्ट्र शासन कृषी विभाग, वसंतराव नाईक कृषी विद्यापीठ परभणी, महाएपीएसी फेडरेशन यांचा यात विशेष सहभाग प्रदर्शनात असणार आहे. कृषी प्रदर्शनात भव्य अशा आठ दालनात द्वारे तब्बल२०० कृषी उत्पादनांची स्टॉल यामध्ये असून कृषी अवजारांची प्रात्यक्षिके या प्रदर्शनात पाहण्यास मिळणार आहे १ दिवसीय पशुप्रदर्शन तज्ज्ञांची चर्चासत्रे आदी उपक्रम या प्रदर्शनात होणार आहे विविध मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदर्शनाचे उद्घाटन व समारोप प्रसंगी कृषी क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणा या शेतक यांचा गौरव करण्यात येणार आहे या प्रदर्शनाचा गेवराई शहरासह जिल्ह्यातील शेतकर्यांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन संयोजन समितीच्या वतीने कृषिभूषण महेश बेदरे बानी केले आहे.

संपादकीय

# आनंदमास



‘सावन का महिना पवन करे सोर, जियरा रे झूमे ऐसे ,जैसे बनमा नाचे मोर ‘ १९६७ मध्ये रिलीज झालेलं मिलन चित्रपटातलं हे गीत श्रावणाच्या देखाव्याची खरी अनुभूती देतं. निसर्गाचं मनमोहक रूप आणि मराठी सणांची आरास असलेला श्रावणमास !! निसर्गाच्या सृजनाचे राजेपद सांभाळत, माहेरवाशीणींना व्रत– वैकल्यात गुंतवून टाकणारा , सणांनी आपापसातील कटूता काढून टाकणारा हा महिना आनंदाची बीजे चित्तवृत्तीत पेरून जातो. निसर्गाने स्वतः भोवती पांघरलेली हिरवीगार शाल , ऊन पावसाशी चालवलेला खेळ, पांढ–या शुभ्र , स्वच्छ, खळाळत्या धबधब्यात न्हाऊन निघणारा डोंगर , डेरेदार झाडाला बांधलेले सुगरणीचे खोपे आणि पारंब्यांना टांगलेले झुले हे श्रावणाचं रूप गावोगावी पहायला मिळतं .आणि पृथ्वीवरील हिरव्या स्वर्गाची अनुभूती येते. लालचुटूक तेरडा , धायरीची तांबूस फुले , विविध रंगी रानफुले , अनेक विध फळे, अनेक खनिजांनी युक्त कंटोर्ली, भोकर , अळू अशा अनेक रानभाज्या असा रानमेवा, पक्ष्यांचा किलबिलाट, श्रावण आपल्या समोर ठेवतो आणि या सा–यामुळे निसर्गाचे हे जणू अनोखे रंगसंमेलनच भासते.

निसर्गाच्या या आविष्काराला विविध सणांची सोबत असते.श्रावणाची सुरवात होते ती नागपंचमीने .शेतीचे रक्षण करून शेतकऱ्यालाही मदत करणा–या नागाचे पूजन हे या सणाचे महत्त्व आहे.यानंतर सारे कोळी बांधव आपल्या व्यवसायाची सुरवात करण्यास सज्ज होतात. समुद्राला नारळ अर्पण करून त्याला शांत करणारा नारळी पौर्णिमेचा सण यानंतर येतो .याचवेळी बहिण– भावाच्या नात्याची वीण अधिक घट्ट करणारा रक्षाबंधनाचा सण असतो.बालकृष्णाच्या बालक्रीडा दाखवणारा , बालगोपालांचा लाडका दहीकालेचा उत्सव मुलांचा आवडता. विवाहित स्त्रीया याच महिन्यात मंगळागौर पूजतात, दर सोमवारी भगवान शंकराला शिवामूठ वाहतात. मंगळागौरीच्या सणासाठी खास वेशभूषा करून , केशभूषा करून ,दागदागिने लेऊन माहेरवाशीणी सणांच्या निमित्ताने माहेरी येतात.आपली सारी सुख – दुःखे आपल्या आई, बहिणी, भावांशी हितगुज करत मनमोकळेपणाने सांगतात.आपल्या दुःखावर मायेची फुंकर घेऊन , आपल्या सासरच्या माणसांचे कोडकौतुक करून सा–या सणांत समरस होतात.श्रावण मासात निसर्ग भरभरून देत असतो त्यामुळे सारे पशु – पक्षीही आनंदात असतात.कुरणे वनी बागडत असतात.बगळ्यांची माळ काळ्या नभाला सुशोभित करते.दुथडी भरून वाहणारी नदी पाणीटंचाईचे सावट दूर करते.एकूणच वातावरण प्रसन्न असते. या वातावरण आपल्याला मात्र वाट्टेल तसे , वाट्टेल तेव्हा , तेलकट, तामसी खाऊन चालत नाही त्यामुळे आजाराबाबत श्रावणमासानेच काही मर्यादा घातल्या आहेत.यातील अनेक व्रतवैकल्यांचे शास्त्र समजून घेणे आवश्यक आहे .आपल्या पोटाला पचेल इतकाच आहारा व शक्यतो शाकाहार या काळात असावा असे शास्त्र सांगते.व्रतवैकल्यांमागे शरीराला आवश्यक असणारे लंघन असावे हा मुलभूत हेतू आहे.या मुळे शिस्त , संयम ह्या गोष्टींचेही आपल्यावर नकळत संस्कार होतात .सर्वामागील विज्ञान आपण समजून घेतले तर श्रावण अधिक आनंद देईल यात तिळमात्र शंका नाही. श्रावणाचे माहात्म्य अनेक कवी ,कवयित्रींनी आपल्या साहित्यातून विशद केले आहे .बालकवींची श्रावणमास कविता , असा रंगारी श्रावण ही ऐश्वर्य पाटेकर यांची कविता श्रावणाचे चपखल वर्णन करणारी आहे.निसर्ग भ्रमंती, ट्रेकिंगसाठी,पावसाळी सहलीसाठी श्रावणमास परफेक्ट आहे असं म्हणायला काहीच हरकत नाही.निसर्गाच्या सानिध्यात जेथे पाहू तेथे फोटोजनिक व्ह्यू असतात.सेल्फीकाढून , फोटो काढून बॅटरी फूल होते, डिपी ठेवायला खूप फोटोंचं कलेक्शन मिळतं .आषाढात प्रचंड पाऊस कधीकधी आपल्या बेतावर पाणी पाडू शकतो पण श्रावणातील पाऊस सहल खूप आनंद देऊन जातो .म्हणूनच श्रावणाचे वर्णन नेमके काय करावे ? धार्मिक, अध्यात्मिक , हृदयस्पर्शी, निसर्गरम्य वा एकात्मिक?

खरं तरं मानवी जीवनाला आशावादी दृष्टिकोन देणारा श्रावण हे परमेश्वराने दिलेले वरदान आहे आणि दरवर्षी मिळणारे आहे.मनाची मरगळ दूर करणारा , झाडापानांना चमकदार करणारा , पवित्र, धार्मिक असा श्रावण. उपासाच्या पदार्थांनी तृप्त ढेकर द्यायला लावणारा असा हा श्रावण .वर्णन करायला शब्द अपुरे पडतील असा हा श्रावण .

श्रावणराजा तू अद्भुतकिमयागार ।
हरित तृणांनी सजली वसुधा नटूनी हिरवीगार ।
ललनाही झाल्या प्रसन्न पहा तुझ्या या रूपांनी ।
श्रावणमासाचे हे गीत गुंफीले या शब्दांनी ।

# झोपडपट्टीमुक्तीच्या वल्गना


‘माणसाला नेमकी किती जमीन लागते?’ ही लिओ टॉलस्टॉयची लघुकथा प्रसिद्ध आहे. सुमारे दीडशे वर्षानंतरही या कथेचे सार आणि प्रश्नाचे मर्म आपल्याला उमगलेले नाही. त्याचप्रमाणे मुंबईसारखी शहरे झोपडपट्टीपासून मुक्त होण्यासाठी नेमकी किती जमीन लागेल, बिल्डरांना किती भूखंड लागेल आणि राजकारणी–नोकरशाही यांना जमिनींच्या विकासापोटी किती मलिदा द्यावा लागेल, या प्रश्नांची उत्तरेही आज कुणाला ठाऊक नाहीत. मुंबई शहर झोपडपट्टीमुक्त करण्याची आणि त्यासाठी बिल्डरांना जमीन आंदण देऊन त्यांच्यामार्फत ४० लाख झोपडीवासियांना मोफत घरे देण्याची योजना १९९५ साली घोषित करण्यात आली. त्यास आता तीन दशके उलटूनही झोपडीमुक्त मुंबईची घोषणा ही केवळ वल्गनाच ठरली आहे.



सर्वोच्च न्यायालयाने या योजनेतील सावळागोंधळाची गांभीर्याने दखल घेतली असून मुंबई उच्च न्यायालयाच्या खंडपीठास मुंबईतील झोपडपट्टी पुनर्वसनाची झाडाझडती घेण्याचे निर्देश दिले आहेत. महाराष्ट्र झोपडपट्टी सुधार, निर्मूलन व पुनर्बांधणी हा कायदा १९७१ पासून राज्यात अस्तित्वात आहे. मुंबई उच्च न्यायालयातर्फे आता या कायद्याची अंमलबजावणी नेमकी किती प्रभावीपणे झाली आहे, त्यातून काय साध्य झाले आहे व त्यात किती गैरप्रकार झाले आहेत, याची तपासणी होणार आहे. खरे तर गेल्या ५० वर्षांत झोपडपट्टी सुधार आणि निर्मूलन याबाबत काय झाले, याचा वेळोवेळी आलेल्या सरकारांनी आढावा घेण्याची गरज होती. ते काम न्यायालयाला हाती घ्यावे लागत आहे, यासारखी शरमेची गोष्ट नाही. कोणत्याच सरकारला किंवा गृहनिर्माण विभाग, सनदी अधिकारी यांनाही अशी गरजच कधी वाटली नाही, याचे कारण उघड आहे. झोपडपट्ट्यांकडे गोरगरिबांच्या निवाऱ्यापेक्षा मतपेट्या म्हणूनच राजकारण्यांनी कायम पाहिले. झोपडीवासियांना पर्यायी घरे देतांना नव्याने झोपड्या उभ्या राहू नयेत, यासाठी १९९५ पर्यंतच्या झोपड्या अधिकृत मानण्याची मर्यादाही ठेवण्यात आली होती. मात्र, लोकप्रतिनिधींच्या रेट्यातून ही मर्यादा २००० सालापर्यंत वाढली. १४ फुटांपर्यंत झोपड्यांना परवानगी देण्याची धोरणे सभागृहांमध्ये मंजूर होते, तेव्हा प्रत्यक्षात झोपड्यांची उंची मात्र त्यापेक्षा तिप्पट झालेली असायची. काही ठिकाणी व्यापारी धंदे चालायचे. मात्र, महापालिका, जिल्हाधिकारी तसेच केंद्र सरकारचे विविध विभाग, ज्यांचे ज्यांचे भूखंड झोपड्यांनी व्यापले होते, त्यांच्या यंत्रणांनी या गोष्टींकडे पूर्णतः डोळेझाक केली.झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी मध्यस्थ म्हणून स्थानिक राजकीय गुंडापुंडांची नवी फळी उदयास आली. गटातटांमध्ये समेट घडवून इच्छुक बिल्डरला शिरकाव करून देण्याची गुरूकिल्ली या लोकांकडे होती. हेच पुढे प्रवर्तक, विकासक म्हणून मिरवू लागले. आलिशान मोटारींनी त्यांचे फॉर्च्युन फळफळले, परंतु झोपडीवासियांचे व शहराचे राहणीमान काही सुधारले नाही. २०११ मधील जनगणनेनुसारही मुंबईतील २४ टक्के भूभाग झोपड्यांनी व्यापलेला होता आणि सुमारे ४८ टक्के जनता झोपड्यांमध्ये राहात होती. एसआरएच्या इमारती ही राहणीमानाच्या दृष्टीनेही दूषणेच ठरली. कधी बिल्डरने कॉर्पस बुडविला म्हणून तर कधी रहिवाशांनी मासिक हिस्सा थकविला म्हणून, या इमारतींची लिफ्ट बंद असणे, वीज कापली जाणे, पाण्याचा खडखडाट अशी परिस्थिती रहिवाशांवर आली. कित्येक प्रकल्प वीस वीस वर्षे केवळ रखडलेले व रहिवासी संक्रमण शिबिरांमध्ये खितपत पडलेले. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण ही यंत्रणा तर एक नवे कुरण ठरली.पुनर्विकसित इमारतीत घरे मिळाल्यावर दहा वर्षे ते विकता येणार नाही, ही अट झोपडीवासियांना मोफत घरे देतांना होती. मात्र त्यास कित्येक ठिकाणी हरताळ फासण्यात आला. घरे विकून लोक पुन्हा झोपडीत गेले. या प्रकारांवर उच्च न्यायालयाने अनेकदा कोरडे ओढले. परंतु सरकारांनी या हस्तांतरणाच्या अटी काढण्याचाच कल दाखविला. म्हणजे झोपड्यानिर्मूलनाच्या हेतूलाच हरताळ फासला गेला. गोरगरीब व कष्टकऱ्यांना स्वस्तात छप्पर मिळाले पाहिजे, हा उद्देश योग्यच. शिवाय, टोलेजंग गगनचुंबी टॉवरना भूखंड देऊन त्याबदल्यात त्यांनी गरिबांसाठी मोफत घरे बांधणे हे आवश्यकही ठरते. परंतु याचा अर्थ टॉवरवाल्यांनी झोपड्यांच्या जिवावर कमवायचे, झोपडीदादांनी हतबल कष्टकऱ्यांच्या आणि अतिक्रमितांनी करदात्यांच्या, असाही होत नाही. या प्रकारांना आळा बसायला हवा. जे मॉडेल मुंबईत राबविले जाते, तेच राज्यभर अस्तित्वात येते. जगातील सर्वांत मोठी झोपडपट्टी आमच्याकडे, असा टेंभा आपण किती काळ मिरवत राहायचा? विदेशातील पर्यटकांचे झोपडपट्टी पर्यटन हेच आपले आकर्षण ठरणे भूषणावह नाही. प्रत्येक निवडणुकीत आजही झोपडीमुक्त मुंबई ही घोषणा द्यावी लागते, हे नगरसेवकांपासून खासदारांपर्यंत आणि सनदी–सरकारी अधिकारी, पोलिस या सर्वांचे अपयश आहे. न्यायालयाच्या दणक्याने तरी या बजबजपुरीतून मुंबापुरीची सुटका व्हावी.

# स्वागतार्ह ‘लेझर’बंदी

पुण्याच्या गणेश विसर्जन मिरवणुकीत लेझर किरणांचा वापर करण्यावर बंदी घालण्याचा पुणे पोलिस आयुक्तांचा निर्णय स्वागतार्ह आणि अनुकरणीय आहे. राज्यातील अन्य शहरांनीही हा कित्ता गिरवायला हवा. खरे तर राज्य सरकारनेच उत्सवांमधील लेझरबंदीबाबत व्यापक निर्णय घ्यायला हवा. गेल्या काही वर्षांपासून गणेशोत्सवातील, विशेषत: मिरवणुकांतील लेझर किरणांचा वाढता वापर अनेकांच्या डोळ्यांना घातक इजा करतो आहे. गेल्या वर्षी पुण्यासह काही शहरांत लेझरमुळे डोळ्यांना गंभीर इजा झाल्याची प्रकरणे घडली. डोळ्यांसारख्या नाजूक अवयवाला अपायकारक ठरणाऱ्या घटकांचा वापर तातडीने थांबविण्यासाठी पुण्यातील नागरिक आग्रही होते. ‘महाराष्ट्र टाइम्स’नेही याबाबत पुढाकार घेतला होता आणि यंदाच्या गणेशोत्सवाची चाहूल लागताच हा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आणला. पुण्यातील या वर्षीच्या गणेशोत्सवाबाबत गणेश मंडळांबरोबरील बैठकीत हा मुद्दा चर्चिला गेला आणि पोलिस आयुक्त अमितेशकुमार यांनी लेझरबंदीचा निर्णय जाहीर केला. ही बंदी धुडकावून लेझरचा वापर करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा इशाराही आयुक्तांनी दिला आहे. या निर्णयाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होईल हे पाहावे लागेल. त्याची जबाबदारी पोलिसांवर आहेच; परंतु गणेश मंडळांच्या कर्त्याधर्त्यांवरही आहे. उत्सव सुरू होण्याच्या आधी अनेक आश्वासने देऊन, आणाभाका घेऊन प्रत्यक्ष उत्सवात त्यांपैकी कशाचीही अंमलबजावणी होत नाही, असा पुणेकरांचा अनुभव आहे. ना ढोल–ताशा पथकांची संख्या कमी होते; ना मिरवणूक लवकर संपते. दरवर्षी तेच ते होते. लेझरवरील बंदीही अशाच प्रकारची असेल, तर त्याचा काही उपयोग होणार नाही.



गणेशोत्सव हा धार्मिक उत्सव असला, तरी त्याला सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय कंगोरे आहेत. हा सार्वजनिक उत्सव सुरू करण्याच्या प्रेरणा स्वातंत्र्य चळवळीशी संबंधित असल्या, तरी समाजमनाला आकार देण्यात, त्याची सांस्कृतिक जडणघडण करण्यात आणि स्थानिक पातळीवरील नवीन नेतृत्व निर्माण करण्यात गणेशोत्सवाचे मोठेच योगदान आहे. अशा उत्सवात काळानुरूप बदल होणे स्वाभाविकच; परंतु दुर्दैवाने त्याला काही वर्षांत उन्मादी स्वरूप येत गेले. ध्वनिवर्धकांच्या उंच भिंती उभारून कर्णकर्कश आवाजात गाणी वाजविण्याने आणि लेझर किरणांच्या भडीमारात बीभत्स नृत्यांनी उत्सवाला विकृत केले; मात्र गणेशोत्सव ही कार्यकर्ते घडविणारी शाळा मानली गेल्याने आणि मतपेढीच्या राजकारणासाठी त्याचा उपयोग होत असल्याने नेतेमंडळींनीही या विकृतीला हातभार लावला. त्यामुळे ही विकृती म्हणजे गणेशोत्सवाचे जणू वैशिष्ट्यच बनत गेली. अशा अनेक विकृती उत्सवात शिरल्या असल्या, तरी त्यांकडे राजकीय नेते चिकित्सकपणे पाहत नाहीत. उलट, याकडे बोट दाखविणाऱ्यांचीच तोंडे बंद करण्याचा प्रयत्न होतो. ‘हा लोकांचा उत्सव आहे, तो त्यांना हवा तसा साजरा करू द्या,’ असे म्हणून उत्सवाला दणदणाटी, कंठाळी स्वरूप देणाऱ्यांना पाठीशी घातले जाते. ध्वनिवर्धकांसाठी सर्वोच्च न्यायालयाने रात्री दहापर्यंतची वेळ दिली असली, तरी गणेशोत्सवात त्याला काही दिवस सवलत देण्याची स्पर्धाच नेत्यांमध्ये लागली. उत्सवाच्या काळात कायदा पायदळी तुडविणाऱ्या कार्यकर्त्यांवर पोलिसांनी दाखल केलेले गुन्हेही मागे घेण्याचीही स्पर्धा निर्माण झाली. यामुळे गणेशोत्सवात काहीही केले तरी चालते, अशी निर्नायकी स्थिती निर्माण झाली. अशा स्थितीत उत्सवाला वळण लावणे आणि नियमन करणे आणखी आव्हानात्मक बनले आहे. लेझरबंदीचा निर्णय या पार्श्वभूमीवर झाला आहे.

हे विधानसभा निवडणुकीचे वर्ष आहे. सर्व ‘भावी आमदार’ गणेशोत्सवाचा धडाका वाढविणार यात शंका नाही. त्याची झलक आजच दिसते आहे. गेल्या काही वर्षांपासून पुण्यासह राज्यातील गणेशोत्सवात ढोल–ताशा यांसारख्या पारंपरिक वाद्यांचा वाढलेला वापर ही खरे तर चांगली गोष्ट म्हणायला हवी. मात्र, त्याचाही अतिरेक होऊन चालणार नाही. उत्सवाच्या दीड–दोन महिने आधीच पुण्यात नदीकाठी आणि मोकळ्या मैदानांत संध्याकाळी ढोल–ताशांचा आवाज घुमू लागतो. वादकांसाठी हा सराव महत्त्वाचा असला, तरी त्या–त्या भागांतील ज्येष्ठांना, मुलांना या आवाजाचा त्रास होतो. कर्णबधीरता येण्यापासून हृदयविकारापर्यंतचे धोके त्यातून उद्भवतात. याचाही विचार करून सरावाच्या जागांचे नियमन व्हायला हवे. विसर्जन मिरवणुकीत या पथकांच्या संख्येपासून त्यांच्या वादनाची वेळ निश्चित करण्यापर्यंत अनेक मुद्दे पोलिस आयुक्तांच्या बैठकीत मांडले गेले. या सर्व मुद्द्यांची अंमलबजावणी व्हायला हवी. मुंबई, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर यांसह राज्यातील अन्य प्रमुख शहरांत गणेशोत्सवाबाबत अशी भूमिका घेऊन ती प्रत्यक्षात आणली जावी. बुद्धीची देवता असलेल्या आणि मांगल्याचे प्रतीक असलेल्या गणेशाच्या उत्सवाला अधिक चांगले आणि नेटके स्वरूप देणे ही सरकारबरोबरच समाजाचीही जबाबदारी आहे.

# शहाणपणाची माघार

प्रस्तावित प्रसारण सेवा नियमन विधेयकाचा मसुदा मागे घेऊन केंद्र सरकारने योग्य निर्णय घेतला आहे. हा मसुदा गेल्या वर्षी तयार झाल्यापासूनच त्याविषयी अनेक शंका–कुशंका विचारल्या जात होत्या. त्यातील अनेक तरतुदींविषयी नाराजी होती. आता सरकारने पुन्हा नवा मसुदा तयार करून तो विचारार्थ सादर करण्याचे ठरविले आहे. टीका आणि आक्षेपांनंतर केंद्र सरकारने ही संवेदनशीलता दाखविली, हे योग्य झाले आहे. ही माघार शहाणपणाची आहे. भारतात १९९५ मध्ये झालेल्या केबल कायद्याने सर्व आधुनिक माध्यमांचे नियमन सध्या होते. या कायद्याला तीस वर्षे होतील. या काळात मनोरंजन, प्रक्षेपण, प्रसारण, दूरसंचार यांचे विश्व प्रत्यक्ष तंत्रसामग्री, प्रक्षेपणाचे तंत्रज्ञान आणि या माध्यमांमधून प्रसारित होणारा मजकूर किंवा कलात्मक आविष्कार अशा सर्व अंगांनी पूर्ण बदलून गेले आहे. ओटीटी म्हणजे ‘ओव्हर द टॉप’ या तंत्रसुविधेमुळे माहिती आणि मनोरंजनाचे नवे विश्व साकारले. ओटीटी ही मुळात व्हिडिओ स्ट्रिमिंग सर्व्हिस असते. तिला इंटरनेटची सुविधा आणि मोबाईल फोनपासून लॅपटॉपपर्यंत कोणतेही साधन पुरेसे असते. ही कमालीची सुटसुटीत, ग्राहकांना हवे ते देणारी, वेगवान आणि निर्बंधमुक्त सुविधा आहे. अमेरिकेत जन्म झाल्यावर तिने सगळे जग पादाक्रांत केले. भारतात आज या व्यवसायाचा व्याप किमान दहा हजार कोटी रुपयांचा असेल. चीनमध्ये तो एक लाख कोटी रुपयांचा आहे. भारतात उद्या काय होईल, याचा यावरून अंदाज यावा. हे सगळे विस्तारित विश्व नियंत्रित व्हावे, अशी सरकारची नव्या कायद्याचे प्रारूप मांडताना कल्पना होती. मात्र, ओटीटीसहित सर्वच स्वतंत्र माध्यमांवर नव्या कायद्याने अनावश्यक नियंत्रण येईल, तेव्हाच सुरू झाली. त्या तक्रारीत तथ्यही होते.

आज लोकप्रिय ओटीटी फलाटांची संख्या दहाच्या घरात आहे. ती वाढत राहणार. जाहिरातींसहित मजकूर किंवा सामग्री मोफत पुरविणे, विशिष्ट कार्यक्रम तितकेच पैसे घेऊन देणे किंवा ओटीटी प्लॅटफॉर्मचा वर्गणीदार बनवून सेवा देणे.. अशा तीन प्रकारे ही सेवा सध्या मिळते. मात्र, या सगळ्यात ग्राहकांच्या पुढ्यात येऊन पडणाऱ्या सामग्री म्हणजे कंटेंटवर कोणत्याही पातळीवर ठोस नियंत्रण नाही. ते आणताना नव्या भारतीय न्याय संहितेच्या चौकटीत (बीएनएस) जे येणार नाही; अशा कंटेट किंवा मजकुराचे नियमन कसे करायचे, याचा आता नव्याने विचार करावा लागेल. गेल्या वर्षी या कायद्याचा प्रस्ताव आला तेव्हा ‘कंटेंट इव्हॅल्यूशन कमिटी’ म्हणजे ‘मजकूर मूल्यमापन समिती’ नेमण्याची कल्पना त्यात होती. या समितीत विविध प्रकारचे माध्यम तज्ज्ञ आणि अधिकारी असतील, असे म्हटले होते. आता सरकार कायद्याचा नवा मसुदा करताना या समितीला अधिक स्वायत्तता देते का आणि सरकारी नियंत्रणापेक्षा तिचा प्रत्यक्ष कारभार या विषयातील तज्ज्ञांकडे सोपविण्यास तयार होते का, याची उत्सुकता आहे. या समितीला जुनी पठडी सोडून नवी तंत्राधारित, वेगवान कार्यपद्धती स्वीकारावी लागेल. तशा नेमक्या सूचना या व्यवसायातली मंडळी आता कशा पुढे आणतात, हे पाहावे लागेल.दुसऱ्या मोदी सरकारने या विधेयकाचा मसुदा प्रसारित केला तेव्हाची आणि आजची राजकीय परिस्थिती वेगळी आहे. मात्र, हा विषय संवेदनशील असल्याने विरोधकांनी त्याची गुणात्मक पारख करण्याची गरज आहे. नवा कडक कायदा असेल तर सरकारी हस्तक्षेपाची जशी भीती आहे; तितकीच भीती आज समाजमाध्यमांत किंवा ओटीटी फलाटांमध्ये चित्रित होणाऱ्या हिंस्र, बीभत्स, नृशंस आणि अर्थहीन कंटेंटचीही आहे. उद्या कोणतेही सरकार आले तरी त्याला गेल्या तीन दशकांत बदलून गेलेल्या या क्षेत्राचे नियमन कसे करायचे, याचा गंभीर विचार करावाच लागेल. डिजिटल तंत्रज्ञानाला आणि प्रक्षेपणाला देशांच्या सीमा समजत नसल्या तरी भारतासारख्या व्यामिश्र देशात ही सगळी तंत्रसाधने मोकाट सुटणेही अपेक्षित नाही. ओटीटीवर येणाऱ्या मालिकांची कंठाळी कथानके, बीभत्स चित्रण आणि अश्लीलता यांच्याविषयी कायम तक्रारींचा पाऊस पडत असतो. हे सारे परदेशात तयार होते आणि इथे दिसते, असेही नाही. अनेक भारतीय निर्माते आणि दिग्दर्शकही अर्थहीन कथानकांच्या अश्लील व हिंस्र मालिका बनवतात. त्यांच्यावर योग्य अंकुश ठेवायचा पण अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा संकोच होऊ द्यायचा नाही; अशी ही तारेवरची कसरत आहे. केंद्र सरकारने आता एक पाऊल मागे घेतल्यानंतर मनोरंजन उद्योग, कायदेतज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ, समाजशास्त्रज्ञ व एकूण सुशील समाज यांनी सरकारला योग्य त्या सूचना कराव्यात. तारतम्याचा तोल जाऊ न देता या महाकाय प्रतिमासृष्टीचे उचित नियमन करणे आवश्यकच आहे.

## लाडक्या बहिणींना करावी लागणार वर्षभराची प्रतिक्षा

# २१०० रुपयांसाठी भाऊबीजेचा मुहूर्त सुधीर मुनगंटीवारांनी केले स्पष्ट

**मुंबई (वृत्तसंस्था)**

महाराष्ट्रात पुन्हा एकदा महायुतीने सत्ता स्थापन केली आहे. विधानसभा निवडणुकीच्या प्रचाराच्या वेळी महायुतीच्या नेत्यांनी लाडकी बहीण योजनेच्या रकमेत वाढ करत २१०० रुपये देण्याचे आश्वासन दिले होते. सरकार स्थापन झाल्यावर खरेच रकमेत वाढ होणार की केवळ निवडणुकीसाठी आश्वासन आहे, असा प्रश्न निर्माण झाला आहे. यावर भाजप नेते सुधीर मुनगंटीवार यांनी उत्तर दिले आहे.

एका वृत्तपत्राला मुलाखत देताना सुधीर मुनगंटीवार यांना प्रश्न विचारण्यात आला की, लाडकी बहीण योजनेअंतर्गत महिलांना दिल्या जाणाऱ्या रकमेत वाढ करू. महिलांना १५०० रुपयांऐवजी २१०० रुपये देण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. ते आश्वासन पूर्ण कराल का? करण राष्ट्रवादीने म्हंटले आहे की हे आश्वासन केवल एकनाथ शिंदे यांचे होते. यावर उत्तर देताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, आम्ही १०० टक्के ते आश्वासन पूर्ण करू. महिलांना दिली जाणारी रक्कम १५०० रुपयांवरून २१०० रुपये अशी वाढवली नाही तर देशात आमची प्रतिमा खराब होईल. निवडणुका जिंकल्यावर आश्वासन पूर्ण न करणारे अशी आमची प्रतिमा देशभर पसरवली जाईल.

पुढे बोलताना सुधीर मुनगंटीवार म्हणाले, मी मुख्यमंत्र्यांना पत्र लिहिणार आहे की आपण आपल्या शब्दांवर ठाम राहायला हवे. महायुतीचा जाहीरनामा समितीचा अध्यक्ष या नात्याने मी आमच्या जाहिरनाम्यातून, संकल्प पत्रातून दिलेली आश्वासने धुळीस मिळू देणार नाही. आमच्या सरकारमध्ये प्रत्येक पात्र महिलेला २१०० रुपये देण्याची क्षमता आहे. मला वाटत नाही की आमचा कोणताही मित्रपक्ष याला विरोध करेल. ही वाढीव रक्कम कोणत्या महिन्यापासून द्यायची यावर चर्चा केली जाईल. आम्ही गेल्या वर्षी भाऊबीजेच्या दिवशी ही योजना लागू केली होती. त्यामुळे आम्ही पुढील वर्षी भाऊबीजेपासून रक्कम वाढवू शकतो, असे सुधीर मुनगंटीवार यांनी स्पष्ट केले आहे.विधानसभा निवडणुकीच्या प्रचारावेळी महायुतीने लाडकी बहीण योजनेचा देखील चांगलाच प्रचार केला होता. याचा फायदा निवडणुकीत मतदानातून झाला असल्याचे दिसत आहे. तसेच महायुतीच्या नेत्यांनी त्यांच्या या विजयाचे श्रेय लाडक्या बहिणींनाच दिले आहे. तसेच लाडकी बहीण योजना ही महिलांना थेट आर्थिक लाभ देणारी योजना निवडणुकीत निर्णायक ठरली असल्याचे मत देखील राजकीय विश्लेषकांनी मांडले आहे.



## भाजप नेत्यांना काय वाटते माहिती नाही

# पण एकनाथ शिंदेंना उपमुख्यमंत्रीपदासह गृहमंत्री पद द्यावे अशी आमची इच्छा-गुलाबराव पाटील

**मुंबई (वृत्तसंस्था)**

एकनाथ शिंदे यांना मुख्यमंत्रीपद मिळावे अशी आमची पूर्वीपासूनच मागणी आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक पाहता त्यांना हे पद मिळाले असते तर फायदा झाला असता. भाजप नेत्यांना काय वाटते आम्हाला माहिती नाही. पण शिंदेंना उपमुख्यमंत्रीपदासह गृहमंत्रीपद दिले जावे अशी आमची मागणी आहे, असे शिवसेना नेते गुलाबराव पाटील यांनी म्हटले आहे.गुलाबराव पाटील येथे पत्रकारांशी बोलताना म्हणाले की, एकनाथ शिंदे यांनी यापूर्वीच सरकार स्थापनेत आपली कोणतीही आडकाठी येणार नसल्याचे म्हटले आहे. त्यांनी भाजपच्या केंद्रीय नेतृत्वाचे आदेश आपल्याला मान्य असल्याचेही सांगितले आहे. आम्ही त्यांचे आदेश पाळणारे शिवसैनिक आहोत. पण एकनाथ शिंदे यांनी सत्तेत रहावे, त्यांनी उपमुख्यमंत्रीपद स्वीकारावे ही आमची मागणी आहे. कारण, त्यांचे भाजपच्या केंद्रीय नेतृत्वासह राज्यातील नेतृत्वाशी चांगले संबंध आहेत. त्यामुळे त्यांचा योग्य तो सन्मान राखला जाईल.केंद्रीय नेतृत्वाकडे आम्ही गृहमंत्रीपदाची मागणी केली आहे. पण त्यांचा निर्णय आम्हाला मान्य असेल. त्यामुळे आता या प्रकरणी कोणता निर्णय घ्यायचा हे सर्वस्वी राज्याच्या नव्हे तर केंद्रीय नेतृत्वावर अवलंबून आहे.

ते पुढे म्हणाले, एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री व्हावे ही सर्वांची इच्छा होती. पण शेवटी ३ पक्षांचे सरकार आहे. तिन्ही पक्षांत समतोल साधण्यासाठी केंद्रीय नेतृत्व जो काही निर्णय घेईल तो आम्ही मान्य करू. तूर्त स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका होईपर्यंत मुख्यमंत्रीपद एकनाथ शिंदे यांच्याकडे हवे होते. कारण, त्याचा महायुतीला फायदा झाला असता. पण नेतृत्वाने ही गोष्ट सोडल्यामुळे आम्ही त्यावर भाष्य करणे योग्य ठरणार नाही. आता एकनाथ शिंदे यांना गृहमंत्रीपद मिळावे अशी आमची मागणी आहे.आम्ही हिंदुत्वासाठी बाळासाहेब ठाकरे यांच्या



विचारांसाठी भाजपशी युती केली. सत्ता आल्यानंतर अजित पवार आले. तेव्हा आम्ही विरोध केला नाही. भाजपच्या नेतृत्वाच्या निर्णयाला साथ दिली. ते आल्यामुळे आम्हाला विधानसभेत कमी जागा मिळाल्या. ते आले नसते तर जास्त जागा मिळाल्या असत्या. याचा अर्थ आमच्या जास्त जागा निवडून आल्या असत्या. पण काही लोकांनी माझ्या विधानाचा चुकीचा अर्थ काढला. शिंदे व भाजपची युती हिंदुत्वासाठी युती झाली आहे. ही विचारांची युती असल्यामुळे ती तुटण्याची शक्यता नाही.एकनाथ शिंदे आता बरे झालेत. त्यांच्या आदेशाने आम्ही पुन्हा कामाला लागलो आहोत. तब्येतीच्या कारणामुळे ऑनलाईन बैठका होणार आहेत. त्यात काय झाले हे नंतर सांगितले जाईल, असेही गुलाबराव पाटील यावेळी बोलताना म्हणाले.

गुलाबराव पाटील यांनी यांनी ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांच्यावरही निशाणा साधला. संजय राऊत यांनी शिवसेना संपवली, उद्धव ठाकरे यांना संपवले, तसेच काँग्रेस व राष्ट्रवादीही संपवली. हा माणूस रोगट आहे. चिकनगुन्यासारखा आहे. त्याने उद्धव ठाकरे यांना चुकीची माहिती देऊन अक्षरशः वेडे केले. आज त्यांच्यामुळेच शिवसेना २० आमदारांवर घसरली आहे, असे ते म्हणाले.

## करमाळा नगरीत शिक्षक भारतीची सह विचार सभा संपन्न



**सोलापूर | प्रतिनिधी**

करमाळा नगरीतील शासकीय विश्रामगृह येथे शिक्षक भारतीच्या सह विचार सभेचे आयोजन करण्यात आले. करमाळा तालुक्यातील खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळांमधील कर्मचाऱ्यांसाठी हक्कासाठी कार्यरत असलेल्या या संघटनेने अविरतपणे आपल्या कार्यात योगदान दिले आहे.सभेत सावित्री फातिमा जिल्हास्तरीय पुरस्कार २०२५ साठी तालुक्यातील आदर्श शाळा, आदर्श शिक्षक, आदर्श क्रीडाशिक्षक, आदर्श लिपिक, आणि आदर्श सेवक यांच्या निवडीस सर्वानुमते मान्यता देण्यात आली. तसेच, शिक्षक भारती दिनदर्शिका २०२५ तालुक्यातील प्रत्येक शिक्षकपर्यंत पोहोचवण्याचे नियोजन करण्यात आले.

या सभेसाठी तालुका अध्यक्ष विजयकुमार गुंड, उपाध्यक्ष किशोरकुमार जाधवर, सचिव सचिन गाडेकर, कोषाध्यक्ष गोरख ढेरे, प्रसिद्धिप्रामुख बाळकृष्ण गायकवाड, संघटक सागर देशमुख, मारुती साखरे, बाळासाहेब भिसे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

## लाडक्या बहिणींची होणार उलटतपासणी ? ;पात्र महिलांनाच लाभ पोहोचवण्यावर सरकारचा भर

**मुंबई (वृत्तसंस्था)**

विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरलेली लाडकी बहीण योजनेच्या अर्जांची पुन्हा उलटतपासणी करण्याचा निर्णय शासनाने घेतल्याची माहिती आहे. खोट्या दाव्यांच्या पडताळणीसाठी अर्जदारांनी दाखल केलल्या कागदपत्रांची पडताळणी केली जाण्याची शक्यता आहे. या उलटतपासणी अंती पात्र लाभार्थी महिलांच्या कागदपत्रांमध्ये काही त्रुटी आढळल्या तर, त्यांना या योजनेपासून मुकावे लागेल. मिळालेल्या माहितीनुसार, या प्रक्रियेत राज्य आणि स्थानिक सरकारी अधिकारी, समाजकल्याण संघांसह अनेक विभागांचा समावेश असणार आहे.विधानसभा निवडणुकीत लाडकी बहीण योजनेची रक्कम १५०० वरून २१०० रुपये केले जाईल, असे आश्वासन महायुतीने दिले होते. आता हे आश्वासन पूर्ण करणार असल्याचे महायुतीच्या नेत्यांकडून सांगण्यात आले आहे. दरम्यान, आतापर्यंत २ कोटींहून अधिक महिलांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाला आहे. हाराष्ट्रात नवे सरकार स्थापन झाल्यानंतर, राज्यभरातील मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पात्र आणि लाभार्थी महिलांसाठी एक तपासणी प्रक्रिया सुरू करण्याच्या तयारीत आहे.सरकार आता केवळ पात्र महिलांपर्यंतच मदत पोहोचतेय ना? याबाबत खात्री करण्यावर भर देणार आहे. आर्थिक सहाय्य वितरणात पारदर्शकता येण्यासाठी ही प्रक्रिया केली जाणार असल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रक्रियेद्वारे, खोटे दावे करणाऱ्या किंवा फसवणूक करणाऱ्यांची ओळख पटवण्यासाठी अधिकृत रेकॉर्डसह सबमिट केलेल्या कागदपत्रांची उलटतपासणी होईल.

**हे लाभार्थी ठरतील अपात्र**

निवृत्तीवेतन प्राप्त करणाऱ्या किंवा चारचाकी वाहनधारक अर्जदारांना अतिरिक्त छाननीला सामोरे जावे लागेल.

ज्या महिलांच्या नावावर पाच एकरांपेक्षा जास्त जमीन आहे, अशा महिला या योजनेसाठी अपात्र असतील.

एका कुटुंबातील फक्त दोन महिलांना या योजनेचा लाभ दिला जाईल.

लाभार्थ्यांना तपासणीच्या विविध टप्प्यातून जावे लागणार

ज्या लाभार्थ्यांना आधीपासून लाभ मिळाला आहे, त्यांना तपासणीच्या अनेक टप्प्यांना सामोरे जावे लागणार आहे.

पहिल्या टप्प्यात ओळखीचा पुरावा, उत्पन्नाचा पुरावा आणि अर्जदारांनी दाखल केलेल्या इतर संबंधित कागदपत्रांची पडताळणी केली जाईल.अधिकारी पडताळणीसाठी थेट लाभार्थ्यांच्या घरी भेट देतील. यामध्ये पात्रतेची पुष्टी करण्यासाठी घरोघरी सर्वेक्षणाचा समावेश असू शकतो.

लाभार्थ्यांनी केलेले दावे ओळखण्यासाठी सरकार त्यांच्या डेटाची तुलना मतदार याद्या, आयकर रेकॉर्ड किंवा आधार-लिंक डेटा अशा अधिकृत डेटाबेससोबत करेल. पडताळणी प्रक्रियेत पंचायत प्रमुख किंवा शहरी संस्थांचे प्रतिनिधी यांसारखे स्थानिक प्रतिनिधी देखील सहभागी होऊ शकतात.

## गटनेता निवडीसाठीच्या बैठकीत चंद्रशेखर बावनकुळे बोलायला उभे राहिले:..अन् देवेंद्र पडणवीसांचे नाव घ्यायलाच विसरले

**मुंबई (वृत्तसंस्था)**

भाजप गटनेता निवडीसाठी झालेल्या बैठकीमध्ये बोलत असताना भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी सर्व नेत्यांचे नाव घेतले. पण यावेळी बावनकुळे हे देवेंद्र फडणवीस यांचे नाव घ्यायचे विसरले. काही क्षणात त्यांना गोष्ट लक्षात येतात त्यांनी देवेंद्र फडणवीस हे स्टेजवर नसल्याने त्यांचे नाव विसल्याचे म्हणताच सभागृहात एकच हशा पिकला.

यावेळी बोलताना चंद्रशेखर बावनकुळे पुढे बोलताना म्हणाले की, मी आधीच सांगितले हा ऐतिहासिक दिवस आहे. माफ करा मी आपले नेते देवेंद्र फडणवीस यांचा उल्लेख करायचे राहून गेले. फडणवीस उपस्थित आहेत. खाली असल्यामुळे राहून गेले.चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, मोदींच्या नेतृत्वात आपण डबल इंजिन सरकार पुढे नेऊ शकतो, महाराष्ट्र हे देशातील सर्वोत्तम राज्य होऊ शकतं. हे जनता आणि मतदारांपर्यंत पोहोचवण्याचं काम केलं.




जनतेने आपल्याला भरभरून यश दिलं. प्रचंड यश दिले. आपल्या सर्वांसाठी आनंदाचा दिवस आहे. ऐतिहासिक विजय आपल्याला मिळाला. सर्वांनी मोदींच्या मार्गदर्शनात आणि फडणवीस यांच्या नेतृत्वात आपण ऐतिहासिक महाविजय व्हावा यासाठी प्रचंड ताकद लावली. प्रचंड मेहनत केली.विधीमंडळ गटनेता म्हणून देवेंद्र फडणवीस यांची निवड झाली आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते चंद्रकांत पाटील आणि सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीसांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला पंकजा मुंडे, आशिष शेलार, गोपीचंद पडळकर यांच्यासह अनेक नेत्यांनी अनुमोदन दिले. एकच प्रस्ताव आल्याने पक्ष निरीक्षक विजय रुपानी यांनी देवेंद्र फडणवीस यांच्या नावाची घोषणा केली.

# मी दिल्लीत वेगळ्या कामासाठी गेलो होतो:अजित पवार अमित शहांना भेटायला गेल्याचे डोक्यातून काढून टाका

**मुंबई (वृत्तसंस्था)**

दोन दिवसांपासून अजित पवार दिल्लीत होते. ते आज मुंबईत परत आलेत. अमित शहा यांची भेट घेण्यासाठी अजित पवार दिल्लीत गेल्याच्या चर्चा माध्यमांमध्ये सुरू होत्या. तसेच अमित शहा यांनी अजित पवारांची भेट नाकारल्याचे वृत्त देखील अनेक माध्यमांमध्ये प्रकाशित झाले होते. मात्र, अजित पवार यांनी खुलासा केला आहे. मी दिल्लीला कुणाला भेटण्यासाठी नाही, तर माझ्या वेगळ्या कामासाठी गेलो होतो. माध्यमांनी दादांना आज भेट नाकारली, उद्या भेट नाकारली, अशा बातम्या चालवल्या. पण मी कुणाला भेटण्यासाठी गेलोच नव्हतो, तर भेट नाकारण्याचा प्रश्न येतच नाही, असे अजित पवार म्हणाले.

अजित पवार म्हणाले, सुनेत्रा पवारांना ११ जनपथ बंगला मंजूर झालेला आहे. सरकारी निवासस्थान असो किंवा स्वत:चे असो, मला निटनिटके लागते हे सगळ्यांना माहीत आहे. त्यामुळे मी तिथे आर्किटेक्टला घेऊन नियमात काय गोष्टी करता येईल यावर चर्चा झाली, असे ते म्हणाले.पुढे बोलताना अजित पवार यांनी पक्षाच्या चिन्ह आणि नावाबाबत सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित प्रकरणाविषयी वकिलांशी चर्चा करण्यासाठी गेलो होतो, असे सांगितले. आमच्या केसेस ज्या चालल्या आहेत, त्याबद्दल मी वकिलांना कधी भेटलो नव्हतो. नेहमी प्रफुल्ल पटेल हेच दिल्लीतील केसेस बाबतची जबाबदारी पार पाडायचे. राष्ट्रवादीच्या चिन्हाबाबतच्या सर्वोच्च न्यायालयात सुरू असलेल्या खटल्याची काल पण तारीख होती. ती पुढे ढकलण्यात आली आहे. आमचा हा विषय देखील सुप्रीम कोर्टात प्रलंबित आहे. मी राज्यातील व्यापामुळे दिल्लीतील वकिलांना भेटता आले नाही. त्यांना भेटणेही आवश्यक होते, असे पवार यांनी सांगितले.अजित पवार पुढे म्हणाले की, आमच्या जवळच्या नातेवाईकाचे लग्न होते, त्यासाठी मी दिल्लीत गेलो होतो. तसेच राज्यापेक्षा दिल्लीत थोडासा आराम मिळतो. त्यामुळे मी दिल्लीत अमित शहा किंवा कुणाला भेटायला गेलो होतो, हे डोक्यातून काढून टाका, असेही अजित पवार म्हणाले. आमची आधीच चर्चा झाली होती. त्यानुसार शपथविधीसंदर्भातील माहिती देवेंद्र फडणवीसांनी सांगितली आहे. आम्ही सगळे मिळून महाराष्ट्राच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न करू. आमच्या अनुभवाचा फायदा राज्यातील सर्व घटकांना कसा करून देता येईल, यासाठी आम्ही काम करणार आहोत. शेतकऱ्यांना संकटातून कसे बाहेर काढता येईल, यावरही काम केले जाणार आहे. त्यासाठी केंद्र सरकार देखील आमच्या पाठीशी आहे, असेही पवार म्हणाले.आता चांगले बहुमत आहे. आम्ही कुणाला नाराज होऊ देणार नाही. ह्याला सांभाळा, त्याला सांभाळा, असे होऊ देणार नाही. त्यासाठी चंद्रशेखर बावनकुळे आणि सुनिल तटकरे त्यांच्या स्तरावर जबाबदारी पार पाडतील. आम्ही सरकारचे काम उत्तम पद्धतीने पार पाडण्याचे काम मनापासून करू. निवडणुकीच्या काळात दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत. राज्याला पुढे नेण्याचे काम करणार असल्याचे अजित पवार यांनी सांगितले.



# मतदान टक्केवारी वाढविण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा सन्मान

## सामाजिक संस्थांपासून व्यापारी महासंघापर्यंत सर्वांनी लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले–डॉ.पांचाळ

**जालना । असलम कुरेशी**

जालना जिल्ह्यातील नागरिकांनी लोकशाही मूल्यांची जाणीव ठेवत मतदान प्रक्रियेत उत्स्फुर्तपणे सक्रिय सहभाग घेतला, ही कौतुकास्पद बाब आहे. सामाजिक संस्थांपासून व्यापारी महासंघापर्यंत सर्वांनी एकत्र येत लोकशाही मजबूत करण्याचे कार्य केले, त्यामुळेच मतदानाच्या टक्केवारीत जालना जिल्हा मराठवाड्यात प्रथम तर राज्यात तिसऱ्या स्थानावर राहिला, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी आज (दि. ४) रोजी येथे केले.

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीत जालना जिल्ह्याने मतदानाच्या उच्च टक्केवारीत महाराष्ट्रात तृतीय आणि मराठवाड्यात पहिल्या क्रमांकावर झेप घेतली आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांचा कॅट अंतर्गत व्यापारी महासंघ जिल्हा जालना यांच्यावतीने विशेष सन्मान करण्यात आला, त्यावेळी सत्काराला उत्तर देताना डॉ. पांचाळ बोलत होते. ते पुढे म्हणाले की, हा पुरस्कार माझ्यासाठी नव्हे, तर जिल्ह्याच्या प्रत्येक नागरिकासाठी आहे. यापुढेही आपण असेच संघटित राहून जिल्ह्याच्या विकासासाठी प्रयत्न करत राहू.



सन्मान पत्राचे वाचन सतीश पंच यांनी केले. सन्मान सोहळ्याचा उद्देश विषद करताना ते म्हणाले की, व्यापारी महासंघाने जालना जिल्ह्याच्या नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी केलेल्या प्रयत्नांबद्दल आणि जिल्हाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या उल्लेखनीय मतदानासाठी कौतुक करण्यासाठीचा हा सन्मान सोहळा आहे. जिल्ह्याच्या प्रगतीसाठी पुढील काळात सामूहिक प्रयत्न करण्याचा संकल्प आपण सर्व मिळून करूयात, अशी साद त्यांनी घातली. कॅटचे मराठवाडा अध्यक्ष हस्तीमल बंब यांनी मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रयत्न करणारे जिल्हाधिकारी डॉ. पांचाळ, जिल्ह्यातील व्यापारी आणि नागरिकांचे आभार मानले आणि व्यापारी महासंघाची लोकशाहीसाठी बांधिलकी अधोरेखित केली.

याप्रसंगी व्यापारी महासंघाचे पदाधिकारी दीपक भुरेवाल, रामकुवर अग्रवाल, संजय लव्हाडे, अशोक हुरगट, अशोक मिश्रा, महिंद्रा कुमार भक्कड, किशन भक्कड, अनिल लोढा, सुनील रुणवाल, पुरुषोत्तम अग्रवाल, श्रीधर देशपांडे, कैलास इघारे, अनिल व्यवहारे, ईन्नरव्हील क्लब ऑफ जालना होरायझनच्या अध्यक्ष ड. अश्विनी धन्नावत, सचिव ड. पिंकी लड्डा आदींची उपस्थिती होती.

# वारकऱ्यांची वारी हि निष्काम वारी असते ह.भ.प मुकुंदकाका जाटदेवळेकर

**कहाळा । प्रतिनिधी**

सर्वसामान्य जीव हा व्यवहार करताना देवाजवळ काहीतरी मागतो ,नवस करतो ,काहीतरी मिळावे याची अपेक्षा करतो. परंतु वारकऱ्यांची भक्ती ही निष्काम भक्ती आहे. पंढरीच्या पांडुरंगाची वारी करणाऱ्या वारकऱ्यांची वारीही निष्काम वारी असते. या वारीतून वारकरी देवाकडे काहीच मागत नाहीत .परंतु वारकऱ्यांना देव सर्व मात्र सर्व काही देतो. असे प्रतिपादन प्रज्ञाचक्षु भागवताचार्य ह भ प मुकुंदकाका जाटदेवळेकर यांनी केले नायगाव तालुक्यातील कहाळा बुद्रुक येथील श्री मल्हारी म्हाळसाकांत महाराज संस्थानात गेल्या दोन दिवसापासून सुरू असलेल्या चंपाषष्ठी उत्सवातील दुसऱ्या दिवशीच्या कीर्तन महोत्सवात ते बोलत होते. ह भ प जाटदेवळेकर महाराज पुढे म्हणाले, देवाला आपण सर्व समर्पण करावे जशी गंगा ही समुद्राला मिळून



सर्वस्व अर्पण करते. तसे आपले जीवन भगवंत आणि गुरु महाराजांच्या चरणी अर्पण करावे. देवाशी व्यवहार करू नये. निष्काम भक्ती करावी. सर्व संतांनी आपल्या जीवनात निष्काम भक्तीच केली आहे. आजही ते संत आजरामर झाले आहेत. परमार्थाचा भार देवावर घालावा. दुसऱ्याचा द्वेष मनात ठेवू नये. असे सांगून जे लोक हलकट आहेत. त्यांचे विचार हलकट आहेत. अशा हलकट विचारांचे लोक दुसऱ्यांचा नाश पाहतात. परंतु देव तसे करत नाही. संसार ही माया आहे. प्रपंचाला कारणीभूत असलेले सर्व विकार नष्ट करण्यासाठी भगवंताची भक्ती करणे गरजेचे आहे. धर्माच्या मार्गाने चालावे. अधर्मी लोकांपासून दूर राहावे. संसारातील प्रत्येक माणूस हा अपराधच करतो. परंतु संत कधीच अपराध करीत नाही. असेही त्यांनी सांगितले. आपल्या कीर्तनातून ह भ प जाटदेवळेकर महाराज यांनी परमार्थ कसा करावा. हे संत जनाबाईंच्या चरित्र आख्यानातून सांगितले आहे.

याप्रसंगी गुरुवर्य नीळकंठ महाराज कहाळेकर, डॉ. धनंजय महाराज कहाळेकर, किरण महाराज कहाळेकर, वेदांत महाराज कहाळेकर, ह भ प मधुसूदन महाराज कापसीकर, सूर्यकांत बोरलेपवार, शिवानंद वट्टमवार, नरेंद्र येरावार ,रमेश चिद्रावार, सूर्यकांत गुंडाळे, गायक हभप विष्णू महाराज तांदळीकर, श्याम महाराज देसाई, बालाजी रुईकर, बालाजी मामा लालवंडीकर, मृदंगाचार्य विश्वेश्वर महाराज कोलंबीकर, गोविंद काशेटवार, माधव आलसटवार, बालाजी आलसटवार, जयराम गाडे, योगेश माने, दतराम मोदलवाड, संतोष मोदलवाड, काशीनाथ माने, रामकृष्ण महाराज वझूरकर, नितीन महाराज कुलकर्णी मरवाळीकर, पांडुरंग चंचलवाड, पांडुरंग काईतवाड, मारोती चलकेवाड, संजय पोटेवाड, विठ्ठल मोदलवाड, अनिरुद्ध पोटेवाड, संदिप मोदलवाड, उत्तम गाडे, रामराव गाडे, दुर्गादास गुरू अंबुलगेकर, पांडु महाराज बरबडेकर, उदय गुरू किवळेकर, कृष्णा महाराज औढेकर, अनिल महाराज, ओंकार गुरू कुलकर्णी, अनंत मामा शिराढोणकर आदीची उपस्थिती होती.

# आरोग्य अधिकाऱ्याच्या विरोधात कारवाई अन्नत्याग आंदोलन सुरवात

**छ. संभाजीनगर । प्रतिनिधी**

गंगापूर : तालुक्यातील रांजणगाव शेणपुंजी येथील डॉ. रोहन दायमा, सोई हॉस्पीटल यांनी एका चार वर्षीय मुलीला मुदतबाहय औषधोपचार प्रकरणी पाठीशी घालणारे तालुका आरोग्य अधिकारी रंगनाथ तुपे यांच्या विरोधात कार्यवाही करण्यात यावी. या मागणीसाठी धाडस सामाजिक संघटनेच्या वतीने ३ डिसेंबर पासून विभागीय आयुक्त कार्यालयसमोर अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे.



गंगापूर तालुक्यातील रांजणगाव शेणपुंजी येथील रोहन दायमा हे डॉ. व्यवसाय करत असून त्यांचे साई हॉस्पीटल या नावाने रुग्णालय आहे परंतू त्यांनी एका लहान बाळाला मुदतबाहय औषधोपचार केला होता. सुदैवाने त्या रुग्णाच्या वडीलांना औषधाची मुदतबाह्य तारीख समजल्याने रूग्ण बचावले आहे. विशेष म्हणजे डॉ दायमा यांच्या पत्नीच्या नावावर मेडीकल चालवत आहे. या बाबत २०सप्टेंबर रोजी गंगापूर तालुका आरोग्य अधिकारी रंगनाथ तुपे यांच्याकडे धाडस संघटने कडून पुराव्यासह तकार दिली होती. परंतू तुपे यांनी धाडस संघटनेचे छत्रपती संभाजीनगर जिल्हा कार्याध्यक्ष मुसा शेख यांना अहवाल देण्यात आला पत्र क. २ नुसार आरोग्य अधिकारी तुपे यांनी डॉ. दायमा हे नियमानुसार रुग्णालय चालवत आहे. असे अहवालात नमूद केले आहे. परंतू त्यांनी दायमांना निर्दोष सोडले आहे. तुपे यांनी डॉ. दायमा यांनापाठीशी घालून माझी तक्रारदार यांची दिशाभूल केल्याने आरोग्य अधिकारी डॉ तुपें विरोधात कार्यवाही करण्यात यावी. या मागणीसाठी धाडस सामाजिक संघटनेच्या वतीने विभागीय आयुक्त कार्यालयासमोर अन्नत्याग आंदोलन सुरू करण्यात आले आहे. अन्नत्याग आंदोलनामध्ये धाडस सामाजिक संघटनेचे जिल्हा कार्याध्यक्ष मुसा शेख, जिल्हा युवा अध्यक्ष प्रदीप ठोंबरे, सामाजिक कार्यकर्ते कडुबाळ धनाड यांचा समावेश आहे

# न्हावाशेवा येथील स.पो.उपनिरीक्षक चंद्रकांत माने यांचे आकस्मिक निधन

**उरण । विठ्ठल ममताबादे**

उरण तालुक्यातील नवीमुंबई पोलिस आयुक्तालय यांतर्गत असलेल्या न्हावाशेवा पोलिस ठाण्यात गोपनीय शाखेत सहाय्यक पोलिस उपनिरीक्षक पदावर कार्यरत असलेले चंद्रकांत रावण माने(५४) यांचे नुकतीच नवीमुंबई येथील अपोलो रुग्णालयात हृदयविकाराच्या झटक्याने आकस्मिक दुःखद निधन झाले आहे.त्यांच्या कुटुंबातील कर्ता असलेल्या चंद्रकांत माने यांची पत्नी,मुलगा,विवाहित मुलगी,जावई असा त्यांचा परिवार आहे.यांच्या आकस्मिक निधनाने कुटुंबीयांवर मोठ्या प्रमाणात शोककळा पसरली आहे.



नोकरी निमित्त उरण शहरात रहिवासी झालेले चंद्रकांत माने यांच्या निधनाची बातमी कानी पडताच उरण तालुक्यातील अनेकांनी शोक व्यक्त केला. त्यांनी नवीमुंबई पोलिस दलात उरण,तुर्भे,नेरुळ, नवीमुंबई विशेष शाखा व शेवटी न्हावाशेवा पोलिस ठाण्यात गोपनीय शाखेत कार्यरत होते.त्यांनी पोलिस दलातील कार्यकाळात विविध क्षेत्रातील व्यक्तींसह सामान्य नागरिकांशी गोड स्वभावामुळे माणुसकीचे ऋणानुबंध निर्माण केले होते.

त्यांच्या निधनाची वार्ता समजताच न्हावाशेवा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक दिलीप चव्हाण यांनी रुग्णालयात धाव घेऊन परिस्थितीची पाहणी करून त्यांचा मृतदेह तात्काळ वाशी येथील महापालिका रुग्णालयात शव विच्छेदन करून सकाळी १०: ०० वाजता त्यांचा पार्थिव रुग्णवाहिकेतून न्हावाशेवा पोलिसांच्या ताफ्यासह त्यांचे नातेवाईकांना त्यांचे मूळ गाव असलेल्या धुत्ता,उस्मानाबाद – धाराशिव येथे रवाना करण्यात आले आहे.तेथील स्मशानभूमीत माने यांच्या पार्थिवावर अत्यंत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

# आमचा स्ट्राईक रेट शिवसेनेपेक्षा चांगला, बरोबरीने खाती द्या;भुजबळ यांची मोठी मागणी

**नाशिक (वृत्तसंस्था)–** महायुतीत शिवसेनेपेक्षा राष्ट्रवादीचा स्ट्राइक रेट जास्त आहे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते छगन भुजबळ यांनी केले आहे. त्यांच्या या विधानामुळे आता राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. तर शिंदेंच्या शिवसेनेपेक्षा अजित पवार गटाचा स्ट्राइक रेट जास्त आहे. स्ट्राइकरेटनुसार आम्ही २ नंबरवर आहोत. महायुतीमध्ये भाजप एक नंबरवर आणि आम्ही दोन नंबरवर आहोत. दरम्यान छगन भुजबळ पुढे बोलताना म्हणाले की, मंत्रिमंडळात नवीन चेहऱ्यांना संधी नेहमी देण्यात येते. यावेळी जरा अडचण जास्त आहेत. दरवेळी १६० असतात. यावेळी जास्त आमदार आहेत. सर्व पक्षांमध्ये नवीन जुने चेहरे येतील, असेही त्यांनी म्हटले आहे.छगन भुजबळ म्हणाले की, प्रत्येक माजी मुख्यमंत्र्यांचा सन्मान राखला जातोच. तो शासनामध्ये असो की जनतेमध्ये सर्वच ठिकाणी त्यांचा सन्मान केला जातो. एकनाथ शिंदेंचा सन्मान राखलाच जाईल ते कुणी सांगण्याची गरज नाही. मंत्रिपदाबाबत प्रश्नावर बोलताना ते म्हणाले की, तुमच्याकडून मी ऐकतोय मला देखील काहीजणांनी नाव पाठवलेत. पण हे सगळं अंदाज आहेत. आमचे नेते अजित दादा आहेत. ते स्वतः फोन करून सांगितलं तेव्हा ते खरं आमचे प्रांत अध्यक्ष आणि कार्याध्यक्ष दिल्लीमध्ये आहेत. त्यांना इकडे बोलावण्यापेक्षा दादा दिल्लीला गेले आहेत. छगन भुजबळ म्हणाले की, अजित पवार यांच्यासोबत आमच्या आमदारांची जी बैठक झाली त्यात आमची चर्चा झाली



की एकनाथ शिंदेंना जास्त जागा मिळाल्या त्यांचे जास्त आमदार निवडून आले. आम्हाला कमी जागा मिळाल्या अन् आमचे कमी आमदार निवडून आले. पण ज्याला स्ट्राइक रेट म्हणतात त्यात भाजप एकनंबर दोन नंबरला अजित पवारांचा गट अन् ३ नंबरला शिंदें साहेबांचा गट आहे. म्हणून त्यांच्या बरोबरीने आम्हाला मंत्रिपद देण्यात यावे अशी आमची मागणी आहे.नाशकात भुजबळांच्या कोटची चर्चा होत आहे. भुजबळांना मोठं मंत्रिपद मिळणार का? अशी चर्चा होऊ लागली आहे. छगन भुजबळ यांनी आज घातलेल्या कोटाची चर्चा होतेय. छगन भुजबळ यांनी आज घेतलेल्या कोटावर मुश्किल टिप्पणी केली आहे. मंत्रिमंडळ नाही तर नाशिकच्या थंडीमुळे कोट घातला आहे. नाशिकपासून पुढे गेल्यानंतर कोट काढून टाकणार आहे, असं भुजबळांनी म्हटलंय.

# महायुतीच्या नेत्यांकडून शपथविधीच्या तयारीचा आढावा

**मुंबई (वृत्तसंस्था)–**एकनाथ शिंदे यांनी आज सह्याद्री अतिथीगृहावर बैठक बोलावली आहे. या बैठकीनंतर कदाचित संध्याकाळी महायुतीच्या नेत्यांमध्ये बैठक होऊ शकते, असे शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी सांगितले. महायुती सरकारचा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी शपथविधी सोहळा पार पडणार आहे. आज महायुतीच्या नेत्यांची आझाद मैदानावर सोहळ्याच्या तयारीची पाहणी केली. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. मुख्यमंत्रीपदाबाबतचा निर्णय ४ डिसेंबर रोजी जाहीर होईल, असेही त्यांनी सांगितले.

महायुती सरकारचा ५ डिसेंबर रोजी शपथविधी ठरला आहे. मात्र, अद्यापही मुख्यमंत्री कोण हे ठरले नाही. त्यातच खातेवाटपावरून एकनाथ शिंदे नाराज असल्याच्या चर्चा आहेत. या सर्व घडामोडींवर संजय शिरसाट यांनी भाष्य केले आहे. तसेच संजय राऊत यांना एक मित्रत्वाचा सल्ला देखील दिला आहे.काळजीवाहू मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची काल तब्येत ठीक नव्हती, त्यामुळे कालच्या सर्व बैठका रद्द झाल्या होत्या. एकनाथ शिंदे यांनी आज दुपारी सह्याद्री अतिथीगृह येथे बैठकीचे आयोजन केले आहे. सह्याद्री अतिथीगृहावरील ही बैठक झाल्यानंतर कदाचित आज संध्याकाळी महायुतीचे वरिष्ठ नेते देवेंद्र फडणवीस, अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांची बैठक होणार असल्याचे शिवसेना नेते संजय शिरसाट यांनी सांगितले.कोण काय बोलले यावर भाष्य केले जाणार नाही. वरिष्ठ नेते जो निर्णय घेतील, तो सर्वांना मान्य असेल, असे संजय शिरसाट म्हणाले. तर अंजल दमानिया यांच्या दाव्यावर भाष्य करणे संजय शिरसाट यांनी टाळले. कोण अंजली दमानिया? काहीही बोलणाऱ्या प्रत्येकाला आम्ही महत्व देत नाहीत, असे ते म्हणाले. पुढे बोलताना शिरसाट यांनी संजय राऊत यांना मित्रत्वाचा सल्ला दिला आहे. राऊत यांनी आता फक्त शांत रहावे. लोकांना कंटाळा येईल, इतके बोलू नका, असे शिरसाट म्हणाले.मुंबईतील आझाद मैदानावरील शपथविधीच्या तयारीचा भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे तसेच शिवसेना आणि राष्ट्रावादी काँग्रेसच्या आमदारांकडून आढावा घेण्यात आला. महायुती सरकारच्या शपथविधीसाठी प्रदेश कार्यालयात भाजपची जय्यत तयारी सुरू आहे. यावेळी चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, प्रवीण दरेकर, प्रसाद लाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते. महायुती सरकारच्या शपथविधीसाठी एनडीए शासित राज्याचे मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री यांना निमंत्रण देण्यात आले आहे. यावेळी केंद्रीय मंत्री, राज्यपाल यांच्यासह केंद्रीय पदाधिकारी, साधू महंत, कलाकार, साहित्यिक यांनाही निमंत्रित केले जाणार आहे.महाराष्ट्रातील निवडणुकीचा निकाल २३ नोव्हेंबरला लागला. महायुती म्हणजेच भाजप–शिवसेना शिंदे–राष्ट्रवादी पवार यांना २३० जागांचे प्रचंड बहुमत मिळाले. मात्र १० दिवस उलटूनही मुख्यमंत्र्यांच्या नावावर निर्णय झालेला नाही. तर भाजप विधिमंडळ पक्षाची बैठक ४ डिसेंबर रोजी सकाळी १० वाजता विधानभवनाच्या सेंट्रल हॉलमध्ये होणार आहे. यामध्ये मुख्यमंत्र्यांचे नाव निश्चित होणार आहे. मुख्यमंत्र्यांचा शपथविधी सोहळा ५ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता आझाद मैदान, मुंबई येथे होणार आहे.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077